आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ मार्च २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- निवडणूक रोख्यांच्या संदर्भातले सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे स्टेट बँकेला निर्देश

- महायुतीचं जागावाटप सन्मानजनक पद्धतीनं लवकरच जाहीर होईल, आणि राज्यात महायुती ४५ पेक्षा जास्त जागा जिंकेल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- आपल्या पक्षाचा विश्वासघात करणाऱ्यांना लोकसभा निवडणुकीत धडा शिकवण्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं आवाहन

- मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावरुन इक्बाल सिंग चहल यांना तत्काळ हटवण्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाचे आदेश

**आणि**

- येत्या दोन दिवसांमध्ये विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><><>**

निवडणूक रोख्यांच्यासंदर्भातले सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज स्टेट बँकेला दिले. रोखे खरेदी करणारा आणि हे रोखे वठवणारा राजकीय पक्ष यांची माहिती उघड होईल असा रोख्यांचा क्रमांकही जाहीर करण्याचे आदेश न्यायालयानं दिले. या रोख्यांचे सर्व तपशील स्टेट बँकेला

जाहीर करावे लागतील, यात कुठलंही दुमत नसल्याचं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं आज स्पष्ट केलं.

<><><><><><>

महायुतीचं जागावाटप सन्मानजनक पद्धतीनं आणि समन्वयानं करुन लवकरच ते जाहीर होईल, आणि राज्यात महायुती ४५  पेक्षा अधिक जागा जिंकेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या काल मुंबईत झालेल्या सभेत उपस्थित नेत्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव दिसत होता, अशी टीका त्यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणाऱ्यांना २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत जनतेनं जागा दाखवून दिली, तशी यावेळीही दाखवेल, असं ते म्हणाले.

सर्वच घटकांसाठी सरकारनं वेगवान निर्णय घेत गेल्या दोन वर्षांत राज्याची प्रगती साधली आहे. आतापर्यंत झालेल्या ५५ मंत्रिमंडळ बैठकांमध्ये जनहिताचे ५०० निर्णय शासनानं घेतले आहेत. राज्यात ५ लाख कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आणली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. मराठा आंदोलनाच्या दरम्यान आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया आणि छाननी सुरु आहे. मराठा आरक्षण न्यायालयात टिकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><><>

महायुतीच्या बैठका आज आणि उद्या होणार असून लवकरच सर्व जागा जाहीर होतील, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात दिली. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी प्रत्येकी २ बूथला भेट देणार आहेत, यात केंद्र सरकारच्या २४ योजनांची माहिती दिली जाणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><><>

शिवसेनेचा विश्वासघात करणाऱ्यांना आगामी लोकसभा निवडणुकीत धडा शिकवण्याचं आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना केलं आहे. ते आज हिंगोली जिल्ह्यात वसमत इथं आयोजित सभेत बोलत होते. आम्ही सत्तेचे भुकेले नाही, जनतेची सेवा करणारे सेवक आहोत. तेव्हा आम्हाला लुबाडून राज्य करू नका. शिवसेनेचं पक्षचिन्ह चोरणाऱ्या गद्दार पक्षाला निवडून देऊ नका, असं, ते म्हणाले.

या सभेला खासदार संजय राऊत आणि संजय जाधव, माजी खासदार सुभाष वानखेडे, डॉ. जयप्रकाश मुंदडा, आदी उपस्थित होते.

उद्धव ठाकरे आज हिंगोलीत मुक्कामी आहेत. उद्या त्यांच्या उपस्थितीत उमरखेड आणि हदगाव इथं पदाधिकाऱ्यांसोबत संवाद मेळावा होणार आहे.

<><><><><><>

आपला उमेदवार कोणत्याही अडचणीत सापडू नये यासाठी राजकीय पक्षांनी नियमांचं काटेकोर पालन करावं, असं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. त्यांनी आज मुंबईत मंत्रालयात नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातल्या मतदानाचं वेळापत्रक, निवडणुकीसाठी विविध पातळ्यांवरची सज्जता, याविषयी सविस्तर माहिती त्यांनी राजकीय प्रतिनिधींना दिली.

निवडणूक प्रक्रिया, नामांकन प्रक्रिया, खर्च या विषयीच्या नियम आणि तरतुदींविषयी त्यांना सविस्तर मार्गदर्शनही चोक्कलिंगम यांनी केलं. या काळात

राजकीय पक्षांना निवडणूक यंत्रणेकडून अपेक्षित सहकार्य देण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

<><><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या चिपी विमानतळावरून फ्लाय-९१ विमान कंपनीची विमानसेवा आजपासून सुरु झाली आहे. बंगळुरूसाठी सोमवार, शुक्रवार आणि शनिवार या दिवशी विमानसेवा तर मंगळवार आणि रविवार या दिवसांमध्ये हैद्राबादसाठी विमानसेवा सुरू होईल. यापूर्वी फक्त मुंबईसाठी चिपीवरून विमानसेवा सुरु होती पण आता बंगळुरू आणि हैद्राबाद ही शहरं जोडली गेल्यानं सिंधुदुर्गमधल्या पर्यटनाला  चालना मिळणार आहे.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावरुन इक्बाल सिंग चहल यांना तत्काळ हटवण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिले आहे. याशिवाय स्वतःच्या मूळ जिल्ह्यात किंवा ३ वर्षांपेक्षा अधिक काळासाठी एकाच ठिकाणी कार्यरत असलेले महापालिका आयुक्त, अतिरीक्त महापालिका आयुक्त, महापालिकेचे उपायुक्त यांचीही बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहे. या सर्व बदल्यांची माहिती उद्या संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कळवण्याच्या सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाचे सचिव एस. के. दास यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिल्या आहेत.

यासंदर्भात निवडणूक आयोगानं २२ फेब्रुवारी रोजी पत्र पाठवूनही संबंधितांच्या बदल्या केल्या नाही, त्याबद्दल निवडणूक आयोगानं स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

<><><><><><>

आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू झाल्यानं **रत्नागिरी**चे जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी आज रत्नागिरी इथं राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. जिल्हाधिकाऱ्यांनी आचारसंहिता आणि निवडणुकीच्या अनुषंगानं आठ प्रकारचे आदेश लागू केले असून, त्या आदेशांचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तिकिरण पुजार यांनी केलं.

**यवतमाळ** जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनीही महसूल भवन इथं प्रशासकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली आणि आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. आणि राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन चर्चा केली.

**धुळे** जिल्ह्यातही उपजिल्हाधिकारी सीमा अहिरे आणि अपर तहसीलदार वैशाली हिंगे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या धुळे शहर विधानसभा मतदारसंघात करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

<><><><><><>

निवडणुका शांततेत पार पडाव्यात या दृष्टीन सर्वांनी आदर्श आचारसंहितेच पालन करण्याच आवाहन सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशोर तावडे यांनी केलं आहे. रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाबाबत त्यांनी माहिती दिली. यावेळी मतदानांची टक्केवारी वाढवण्यासाठी जिल्हाभरात विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं....

**होल्ड - बाईट - किशोर तावडे, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग**

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राधानगरी ते म्हादेई या परिसरात सहा पट्टेरी वाघांचा वावर असल्याचं जिल्ह्याचे उपवनसंरक्षक अधिकारी नवकिशोर रेड्डी यांनी म्हटलं आहे. त्याबरोबरच दोडामार्ग तालुक्यातल्या केर परिसरात ६ हत्तींचा वावर असून बिबटे आणि गव्या रेड्यांची संख्या जास्त असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. प्रत्येकवेळी वनविभागाच्या कॅमेरामध्ये वाघ दिसतीलच असं नाही पण त्यांच्या कमी जास्त होणार्या संख्येवरुन याबाबत माहिती मिळत असल्याचं रेड्डी यांनी सांगितलं.

<><><><><>

डेंग्यूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असून या आजाराशी लढा देण्यासाठी सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचं मत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव लाम चोंगोई स्वीटी चांगसान यांनी व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं आज झालेल्या डेंग्यू परिषदेत त्या बोलत होत्या. नगरनियोजन आणि जनतेच्या आरोग्य सुरक्षेशी संबंधित सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करून डेंग्यूच्या विरोधात लढलं पाहिजे, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज दिवसअखेर १०५ अंकांची वाढ झाली, आणि तो ७२ हजार ७४८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३२ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ५६ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

गेल्या २४ तासांमध्ये विदर्भात तुरळक ठिकाणी गारा पडल्या असून काही ठिकाणी घोंगावणारा वारा होता. तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडे होते.

येत्या दोन दिवसांमध्ये विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा, आणि गारा पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**